MHAH140005072019

**रे.मु.क्र. ३८१/२०१९**
सुलोचना व इतर वि.प्रकाश व इतर

## निशाणी क्र.५ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याविरूध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** -

२. वादींनी दावा मिळकती दाव्यात परिच्छेद क्र. १ मध्ये विशेषतः नमुद केलेल्या आहेत. वादी व प्रतिवादींचे मुळ पुरूष चंद्रभान हे सन १९७७ साली मयत झाले. मयत चंद्रभानचे हयातीत वादी व प्रतिवादींचे एकत्र हिंदू कुटूंब होते. मयत चंद्रभान यांना प्रतिवादी क्र. ६ ज्ञानदेव, मयत शामराव व मयत शंकर अशी तीन मुले होती व भामाबाई, यमुनाबाई व भिमाबाई अशा तीन मुली होत्या. दावा मिळकतीचा मुळ सर्व्हे क्र. ११३ होता व गट योजनेमध्ये त्याला गट क्र. ३३० असा पडलेला होता. मयत चंद्रभान यांनी १९५६ साली दावा मिळकतीपैकी अर्धा हिस्सा व इतर मिळकती प्रतिवादी क्र. ६, मयत शामराव व मयत शंकर यांना कुटुंब व्यवस्था म्हणुन पाच आणे चार पै क्षेत्र वहिवाटीस दिले व दावा मिळकतीपैकी अर्धा हिस्सा आणि इतर मिळकती स्वतःचे वहिवाटीस ठेवल्या. त्यानंतर सन १९७८ साली मयत चंद्रभान यांच्या तिन्ही मुलांनी म्हणजे प्रतिवादी क्र. ६, मयत शामराव व मयत शंकर यांनी कुटुंब व्यवस्था म्हणून दावा मिळकतींमध्ये मोघम स्वरूपाने प्रत्येकी पाच आणे चार पै प्रमाणे हिस्सा करून तशी वहिवाट सुरू केली त्या वेळी दक्षिणेकडील काही क्षेत्र सामाईक ठेवण्यात आले. पुढे कुटुंबव्यवस्था म्हणुन मयत चंद्रभान यांच्या तिन्ही मुलांनी दाव्यात नमुद केल्यानुसार त्यांच्या नावावर आलेल्या क्षेत्राच्या नोंदी दाव मिळकतीच्या रेकॉर्डला केल्या. सदर नोंदी खराब्याचे क्षेत्र सोडून इतर क्षेत्रास झालेल्या आहेत. दावा मिळकतींतील दक्षिणेकडील सुमारे ४० ते ५० खराब्याचे क्षेत्र सामाईकात ठेवलेले आहे व तेथे वादी व प्रतिवादींपैकी काहींच्या वस्त्या आहेत. वादी आणि प्रतिवादींमध्ये सरस निरस मानाने

वाटप झालेले नाही. वादींनी वाटपाची मागणी करूनही प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप करून दिले नाही. अशी परिस्थिती असताना दि. २०.०३.२०१९ रोजी प्रतिवादी क्र. २ ने दावा मिळकतींपैकी वादींच्या मालकी वहिवाटीच्या क्षेत्रात अचानक लोखंडी पोल व इतर साहित्य आणुन कांदा चाळ मोठया स्वरूपात बांधणार असल्याचे सांगितले. वादींनी प्रतिवादी क्र. २ ला दावा मिळकतींचे वाटप होत नाही तोपर्यंत कोणतेही पक्के बांधकाम करू नका अशी विनंती केली. परंतु त्यास सदर प्रतिवादीने नकार दिला. दि. २१.०३.२०१९ रोजी प्रतिवादी क्र. २ ने कांदा चाळीच्या शेडसाठी खड्डे खोदण्यास सुरूवात केली आणि वादीच्या दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला. त्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकतीत कोणत्याही स्वरूपाचे पक्के बांधकाम अगर शेडचे बांधकाम करू नये आणि दावा मिळकतींचे हस्तांतरण करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यासाठी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांचे म्हणणे (नि.क्र.२४) दाखल केलेले आहे. सदर प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादींनी सदर अर्जात शेडचे बांधकाम करू नये असा मनाई हुकूम मागितलेला आहे. परंतु प्रत्यक्षात प्रतिवादी क्र. ३ याने त्याचे अ.पा.क. प्रतिवादी क्र. २ याच्या मार्फत गट क्र. ३३० मध्ये त्याच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनाच्या अनुदानात शासनाच्या नियमानुसार व अटीनुसार ४५ X १८ फुट या क्षेत्रामध्ये कांदाचाळ बांधलेली असुन सदर कांदा चाळीचे बांधकाम दि. १५.०३.२०१९ रोजी पुर्ण झालेले आहे. पुढे सदर प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील शंकर चंद्रभान पटारे यांच्या हयातील गट क्र. ३३० या मिळकतीचे पुर्वीच वाटप झालेले आहे. वादी क्र. १ हिने गट क्र. ३३० पैकी ० हे ८१ आर जमीन खरेदीखताने विकलेली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्या हिश्यास आलेल्या गट क्र. ३३० पैकी मधल्या वाटणीतील ० हे ८१ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. ९ यास कायम खरेदीखताने विक्री केलेले आहे. मयत शामराव, मयत शंकर व प्रतिवादी क्र. ६ यांच्यात गट क्र. ३३० चे आपसात वाटप झालेले आहे. गट क्र. ३३० पैकी दक्षिणेकडील त्रिकोणी कोपरा १ एकर २० गुंठे क्षेत्र वस्ती व खळेवाडग्यासाठी सोडून उर्वरीत गट क्र. ३३० चे सरस निरस मानाने वादी व प्रतिवादींचे पुर्वहक्कदार व प्रतिवादी क्र. ६ यांच्यात आपसात वाटप झालेले आहे. सदर वाटपाबाबत वादींना माहिती होती. परंतु तरीही वादींनी

सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. मयत शामराव यांच्या हिश्यास आलेल्या वाटणीत वादी व प्रतिवादी क्र. ६ चा काहीही हक्क संबंध नाही. दावा मिळकतीचे पुर्वीच वाटप झालेले असल्यामुळे वादींना तुर्तातुर्त मनाई हुकूम मागता येणार नाही. म्हणून सदर प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

५. न्यायालयाच्या विचारार्थ निघालेले प्रश्न व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे-

| | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींना सकृतदर्शनी केस आहे काय? | **अंशत:** |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने झुकणाराआहे काय? | **अंशत:** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय? | **अंशत:** |
| ४. | आदेश कोणता? | **अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.** |

**- कारणमिमांसा -**

**प्रश्न क्र. १ ते ३ बाबत -**

(वरील प्रश्न एकमेकांशी संलग्न असल्याने त्यावरील निष्कर्ष मी एकत्रात देत आहे.)

६. वादींनी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा (नि.क्र.४५) दाखल केलेला आहे. वादींनी दाव्यात गट क्र. ३३० पैकी वेगवेगळे क्षेत्र दर्शविले असून वेगळया मिळकती असल्याचे कथन केलेले आहे. परंतु गट क्र. ३३० चा एकच ७/१२ उतारा (नि.क्र.४५) न्यायालयीन अभिलेखात दाखल आहे. वादींच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. २ याने दावा मिळकतीत कांदा चाळीचे शेड उभारण्यासाठी खड्डे खोदलेले आहेत आणि तेथे प्रतिवादी क्र. २ कांदा चाळीचे बांधकाम करणार आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दिलेले त्यांचे म्हणणे (नि.क्र.२४) यावरून असे दिसुन येते की प्रतिवादी क्र. ३ याने त्याचे अ.पा.क. मार्फत दावा मिळकतीमध्ये त्याच्या स्वतंत्र मालकीच्या

वहीवाटीच्या हिश्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या नियम व अटीनुसार ४५ X १८ फुट या क्षेत्रामध्ये कांदा चाळ दि. १५.०३.२०१९ रोजी बांधलेली आहे. त्याबाबतचे फोटो पुरसिस (नि.क्र.२२) सोबत प्रतिवादी क्र. ३ ने दाखल केलेले आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. ३ ने दावा मिळकतीत कांदा चाळीचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ दावा मिळकतीपैकी उर्वरित क्षेत्रात बांधकाम करत आहेत किंवा बांधकाम करण्याचा प्रयत्न करत आहेत असे कोणतेही कथन वादींनी प्रस्तुतच्या अर्जात केलेले नाही. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जीत मिळकती असल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादी आणि प्रतिवादी हे दावा मिळकतींमध्ये सहहिस्सेदार आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकती विक्री केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे वादींना सकृतदर्शनी केस आहे आणि न्यायाचा तराजू देखील वादींच्या बाजूने झुकणारा आहे. त्यामुळे वादी, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरण किंवा विक्री करू नये या संदर्भात तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी प्रश्न क्र. १ ते ३ चे उत्तर त्याप्रमाणे देत आहे व प्रश्न क्र. ४ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे -

**- आदेश -**

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा मिळकतींचे ति-हाईत इसमास कोणत्याही प्रकारे विक्री किंवा हस्तांतरण करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम सदर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याविरूध्द देण्यात येत आहे. |
| ३. | प्रस्तुत अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट राहील. |

(**श्रीमती सु. ध. सोनी**)
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
नेवासा

दिनांक - १२.०२.२०२०